## महाराष्ट्र शासन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे-४११००१

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

http://barti.maharashtra.gov.in

**बार्टी, टीआरटीआय, सारथी व आर्टी या संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या न्यायिक सेवा (विधी) पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) करिता उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत....**

बार्टी, टीआरटीआय, सारथी व आर्टी या संस्थांमार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासाकरिता विविध प्रकल्प, योजना राबविल्या जातात. तसेच सदर संस्थांच्या लाभार्थी गटातील युवक आणि युवतींकरिता विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. सदर स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनामार्फत सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार उक्त संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या न्यायिक सेवा (विधी) पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व मार्गदर्शन देऊन शासकीय नोकरीची संधी मिळावी म्हणून खासगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थामार्फत प्रशिक्षण देणेकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेचा सविस्तर तपशिल, शासन निर्णय, आवश्यक कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ **http://barti.maharashtra.gov.in** ला भेट देऊन या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवरुनच ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड ही सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) व्दारे गुणांकन पध्दतीने करण्यात येणार आहे.

पात्र व इच्छुक उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, आरक्षण व सीईटीमधील प्राप्त गुणांनुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती यांचेकडे राहतील.

स्वाक्षरी..

(सुनील वारे)

**महासंचालक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा सदस्य, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती.**